## प्रेसनोट

| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलढाणा |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.विजय साहेबराव रिंढे,वय ५० वर्ष,व्यवसाय-नोकरी,पद-ग्रामसेवक,ग्रामपंचायत,देऊळगावमही,पंचायत समिती, देऊळगावराजा जि.बुलढाणा रा.शेलसूर ता.चिखली जि.बुलढाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/- रुपये |
| घटनास्थळ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र,बुलढाणा चे आवार |
| घटना तारीख | दि. २९.०३.२०२३ |

**थोडक्यात हकीकत :-**

गुन्हयाची हकीकत अश्याप्रकारे आहे की, तक्रारदार,वय ४२ वर्षे, व्यवसाय-नोकरी यांची देऊळगावमही येथे सामाईक शेतजमीन असून सदर शेतजमीनीवर गावातील काही लोकांना अतिक्रमण केलेले आहे. सदरची शेतजमीन अकृषक नसताना त्या जमीनीबाबत ग्रामपंचायत कार्यालय,देऊळगावमही येथे नमुना ८-अ रजिष्टरला नोंद करण्यात आली आहे. सदर नोंद रद्द करण्याकरिता तक्रारदार यांनी पंचायत समिती,देऊळगावराजा यांचेकडे अर्ज केला होता. सदर अर्ज ग्रामपंचायत,देऊळगावमही येथे वर्ग करण्यात आला होता. सदर नोंद रद्द करण्यासाठी यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ३,०००/- रूपये लाचेची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांना पंचासमक्ष ३०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तरी यातील लोकसेवक श्री.विजय साहेबराव रिंढे, वय ५० वर्ष, व्यवसाय-नोकरी, पद-ग्रामसेवक ग्रामपंचायत देऊळगावमही, पंचायत समिती, देऊळगावराजा जि.बुलढाणा रा.शेलसूर ता.चिखली जि.बुलढाणा यांचेविरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतीबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कार्यवाही :-१. मा. श्री.मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

२. मा. श्री.अरुण सावंत,अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

३. मा. श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

४. मा. श्री.संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक व सापळा पथकातील स्टाफ पोहेकॉ विलास साखरे, नापोकॉ.प्रविण बैरागी, जगदीश पवार, विनोद लोखंडे, मपोकॉ स्वाती वाणी, चालक नापोकॉ नितीन शेटे, ला.प्र.वि. बुलढाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२५४८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केले आहे

Sachin

( सचिन इंगळे )
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा

Scanned with CamScanner